**रे. दि. मु. क्र. २३६/२०१६**

श्री. अंकुश शंकर थोरात ..... **वादी**

**वि.**

मा. उपअभियंता सार्वजनिक बांधकाम वगैरे .... **प्रतिवादी**

**नि. २४ वरील आदेश**

१. प्रतिवादी क्र. ३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे दावा मिळकतीच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी कोर्ट कमिशनर नेमण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीने नि. २७ वर या अर्जास म्हणणे देवून कोर्ट कमिशनर नेमण्यास हरकत नसल्याचे परंतू कोर्ट कमिशनरना त्यांच्याकडे उपलबघ असलेल्या नकाशाप्रमाणे दावा मिळकतीची पाहणी करुन तसा अहवाल देण्याचे निर्देश व्हावेत असे कथन केले आहे. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला.

३. प्रस्तुतचा दावा हा रस्त्याच्या रुंदीच्या मुद्याबाबत वाद निर्माण झाल्याने दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी या वादाचा निपटारा करण्यासाठी प्रतिवादी क्र. ३ ग्रामपंचायतने प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादींच्या म्हणण्याप्रमाणे सदरचा ग्रामीण मार्ग क्र. ४३ हा भुयाचीवाडी या गावाकडे जातो या रस्त्याची रुंदी ३३ फूट आहे. तथापि, या रुंदीच्या मापावर वादीने आक्षेप घेतलेला आहे. त्यामुळे या रस्त्याची वस्तुस्थिती व सध्याची स्थिती ही न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. सदरचा रस्ता हा वादीचा गट क्र. १३४ मधील भाग आहे किंवा नाही हा दाव्याचा वाद विषय आहे. हा रस्ता गट क्र. १३४ च्या उत्तर बाजुने हद्दीवरुन हद्दीस घासून पुर्वपश्चिम जातो असे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे या प्रकरणी भुमी अभिलेख खात्यातर्फे या रस्त्याची मोजणी झाल्यास या वादाबाबत अंतिम न्यायनिर्णय करणे न्यायालयास सोपे जाणार आहे. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद व म्हणणे विचारात घेता या प्रकरणी उप अधीक्षक भुमी अभिलेख यांचे मार्फत मोजणी करणे आवश्यक आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

# आदेश

१. उप अधीक्षक भुमी अभिलेख, कराड यांची याकामी कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक केली आहे व त्यांना असे निर्देश देण्यात येतो की, त्यांनी त्यांच्याकडील उपलब्ध नकाशाप्रमाणे भुयाचीवाडी येथील ग्रामीण मार्ग क्र. ४३ याची गट क्र. १३४ च्या उत्तर बाजुचे हद्दीपासून रुंदी याची मोजणीकरुन नकाशासह अहवाल या आदेश तारखेपासून तीन महिन्याच्या आत या न्यायालयात सादर करावा.

२. वादी व प्रतिवादी यांनी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता कमिशनर यांचेकडे करावी.

३. प्रतिवादी क्र. ३ यांनी कोर्ट कमिशनर फी ची रक्कम उप अधीक्षक भुमी अभिलेख, कराड यांचे कार्यालयात या आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जमा करावी.

४. कोर्ट कमिशनर यांना कमिशन पत्र द्यावे.

(न्यायासनावर निवेदीत व अधिघोषीत केले)

कराड.
दि. ०२/०७/२०१६

**(प्र. अ. सवदीकर)**
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड

गणेश धों. जाधव,
लघलेखक (नि. श्रे.)